# प्रकरण चौथे

# संशोधन कार्यपद्धती

# प्रकरण चौथे

## संशोधन कार्यपध्दती

4.01 प्रास्ताविक

4.02 पूर्वतयारी

4.03 संशोधन पध्दती

4.04 नमुनानिवड

4.05 संशोधनाची साधने

4.06 मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली

4.07 केंद्रप्रमुख यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची

4.08 शिक्षणविस्तार अधिकार्यासाठी प्रश्नसूची

4.09 प्राथमिक शाळांना भेटी व निरीक्षणे

4.10 संशोधनाची कार्यपध्दती

4.12 समारोप

# प्रकरण- चौथे

## संशोधन कार्यपध्दती

### 4.01 प्रास्ताविक

प्राथमिक शिक्षण्याच्या प्रशासनाचा चिकित्यक अभ्यास या विषयावर संशोधन करण्याचे निश्चित केल्यावर संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी उस्मानाबाद तालुका निवडला. उस्मानाबाद तालुक्याला नैसर्गिक पार्श्वभूमी लाभली आहे. सह्याद्रि पर्वताच्या उपरांगा पैकी बालाघाट डोंगराच्या रांगा तालुक्याच्या सीमेपर्यंत आलेल्या आहेत. बालाघाट डोंगर रांगांच्या दक्षिणेकडील भागात विस्तीर्ण सपाट प्रदेशात उस्मानाबाद तालुका आहे.

उस्मानाबाद तालुक्याच्या उत्तर सीम्वेवरुन तेरणा नदी वाहते. उस्मानबाद तालुक्यातुन ही नदी वाहते परंतु या वरील मोठे धरण मात्र उमरगा तालुक्यात बांधण्यात आलेले आहे. त्यामुळे उस्मानाबाद तालुक्यात पाण्याचे स्त्रोत फार कमी आहेत. उस्मानाबाद तालुक्यात जलसिंचनाची सोय नाही. त्याप्रमाणे येथील अनियमीत व बेभरवश्याच्या पावसामुळे उस्मानाबाद तालुका सतत दुष्काळाच्या छायेत असतो. पाण्याची सोय नसल्यामुळे उस्मानाबाद तालुक्याची आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगती जेवढी व्हावी तेवढी झालेली नाही.

शिक्षण हा संस्कार आहे आणि संस्कारतून संस्कृतिचा विकास होतो. सामाजिक प्रगतिसाठी शिक्षणाची संधी आवश्यक आहे. उस्मानाबाद तालुक्यात शिक्षणाची सर्वांना समान संधी मिळत आहे.

उस्मानाबाद तालुक्यातील शैक्षणिक कार्य सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मोलाचे आहे. उस्मानाबाद तालुक्यात अगदी वाड्या, तांडे व वस्तीवर सुध्दा प्राथमिक शाळा व बालवाड्या आहेत. तालुक्यात मोठ्या गावात माध्यमिक शाळा आहेत.

या तालुक्यातील केंद्रस्थानी असलेल्या येडशी, तेर, ढोकी, तडवळा, उपळा, तेरणानगर, काजळा, समुद्रवाणी, सारोळा, कनगरा, बावी, रुईभर, बेंबळी, पोहनेर या गावामध्ये केंद्रिय प्राथमिक शाळा व माध्यामिक शाळांची सोय आहे. संशोधकाने उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळा अभ्यासासाठी निवडलेल्या आहेत.

संशोधक उस्मानाबाद तालुक्याशी भावनिक दृष्ट्या एकात्म झालेला असल्याने संशोधकांने उस्मानाबाद तालुका

निवडलेला आहे. उस्मानाबाद तालुक्यात प्राथमिक शाळा कोठे आहेत याचे सर्व प्रथम निरीक्षण केले.

उस्मानाबाद तालुक्यातील, ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा जिल्हा परिषदेकडुन चालविल्या जातात. त्याचबरोबर काही प्राथमिक शाळा खाजगी संस्थेमार्फत चालविल्या जातात. उस्मानाबाद शहरात बहुतांशी शाळा (24) नगर पालिकेकडुन चालविल्या जातात.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने या तालुक्यातील सर्वच 130 प्राथमिक शाळांची निवड केली. या प्राथमिक शाळात पहिली ते चौथी, पहिली ते सातवी व पहिली ते दहावी असे वर्ग आहेत. अशा रितीने सर्वच बाबतीत विविधता असलेल्या प्राथमिक शाळांचा संशोधकाने अभ्यास करण्याचे ठरविले.

4.02 **पूर्वतयारी** :-

उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडल्यानंतर उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करण्याचे निश्चित केले. अनुदानित प्राथमिक शाळांचे प्रशासन कसे चालते हे पाहणे आवश्यक आहे. येथे विना अनुदानित प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

उस्मानाबाद तालुक्यातील 85 % प्राथमिक शाळा ह्या स्थानिक स्वराज्य संस्था ( जिल्हा परिषदा व नगर पालिका ) मार्फत चालविल्या जातात. त्यामुळे या शाळाची सुरुवात होताच त्यांना अनुदान मिळते. फक्त 15 % प्राथमिक खाजगी संस्था मार्फत चालविल्या जातात. त्यातीलही 10 % शाळा आज अनुदानित आहेत. केवळ 5% शाळा ह्या विनाअनुदानित आहेत. त्याचप्रमाणे संशोधनासाठी निवडलेल्या शाळांची वाढत जाणारी संख्या (130) यामुळे या संशोधनात विनाअनुदानित प्राथमिक शाळांच्या प्रशासनाच्या अभ्यास येथे करण्यात आलेला नाही.

उस्मानाबाद तालुक्यामधील 130 पैकी संशोधकाने 10 प्राथमिक शाळांना भेटी दिल्या. संशोधकाने तेथील शालेय परिसर, वातावरण, इमारत तसेच इतर भौतिक बाबी व मुख्याध्यापक शिक्षक यांच्याशी चर्चा केली. प्राथमिक शाळेचा प्रमुख प्रशासक मुख्याध्यापकांची संशोधनासाठी निवड केली.

प्राथमिक शाळांच्या प्रशासनाची कार्यवाही मुख्याध्यापकांकडून केली जाते. म्हणून संशोधकाने मुख्याध्यापकांची निवड केली. 10 ते 12 प्राथमिक शाळांसाठी एक केंद्रीय प्राथमिक शाळा असते. या शाळांची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी केंद्रप्रमुख मदत करीत असतो. केंद्रप्रमुखांकडे शैक्षणिक व प्रशासकीय कामे असतात. म्हणून संशोधकाने केंद्रप्रमुखांचीही मदत संशोधन कार्यासाठी घेतली.

अठरा ते वीस प्राथमिक शाळांचे मिळून एक बीट बनते. या बीट मधील प्राथमिक शाळांच्या समस्या त्याची शैक्षणिक व प्रशासकीय कामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक शिक्षण विस्तार अधिकारी नेमलेला असतो. प्राथमिक शिक्षणातील महत्वपुर्ण दुवा असलेल्या शिक्षणविस्तार अधिकाऱ्याचेही सहकार्य संशोधन कार्यासाठी घेतले.

उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रमुख म्हणून गटशिक्षणाधिकारी काम पाहतो. त्यांची निवड संशोधन कार्यासाठी केली.

प्राथमिक शिक्षणाचे तालुक्यातील प्रशासन गटशिक्षणाधिकाऱ्यामार्फत चालते त्यांना शिक्षणविस्तार अधिकारी केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक या कामी मदत करतात. संशोधकाने संशोधनासाठी निश्चित कार्यक्रम ठरविला.

गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख या सर्वांना संशोधन कार्याचा आराखडा प्रथम भेटीतच सांगितला. मुख्याध्यापकांना प्राथमिक शिक्षणाबाबत प्रश्नावली देऊन भरुन घेण्यात आली.

गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक या सर्वांची संशोधन कार्यासाठी निवड केली.

4.03 **संशोधन पध्दती** :-

शैक्षणिक संशोधन विविध पध्दतीने केले जाते. त्यांचे पुढील तीन विभागात विभाजन केले जाते.

1) भूतकाळांशी संबंधित असणाऱ्या समस्यांचे संशोधन.

2) वर्तमानकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्यांचे संशोधन.

3) भविष्यकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्यांचे संशोधन.

शैक्षणिक संशोधनांचे तीन प्रकार आहेत.

1) ऐतिहासिक संशोधन पध्दती

2) प्रायोगिक संशोधन पध्दती

3) वर्णनात्मक संशोधन पध्दती

वर्तमानकाळाशी संबंधित असलेले संशोधन ज्या पध्दतीने पूर्ण केले जाते त्यारा वर्णनात्मक संशोधन पध्दती असे म्हणतात. वर्तमानकाळाशी संबंधित असणारे पुढील सर्व प्रकार वर्णनात्मक संशोधनाच्या विभागामध्ये घेतलेले आहेत.

अ) सर्वेक्षण पध्दती ब) व्यक्ती अभ्यास क) तौलनिक कार्यकारण पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण ही संशोधन पध्दती म्हणून स्विकारलेली आहे. संशोधनासाठी प्राथमिक शाळांच्या प्रशासनातील अंतर्गत मुख्याध्यापकांचा विचार केला आहे. शासकीय प्रशासनातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचा संशोधनात विचार केलेला आहे.

या संशोधन काळात पुढील अभ्यास घटकाचा समावेश करण्यात आला.

1) प्राथमिक शाळेतील प्रशासनाचे सर्वेक्षण.

2) प्राथमिक शिक्षणाच्या शासकीय प्रशासनाचे सर्वेक्षण.

3) प्राथमिक शाळांच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास.

4) प्राथमिक शिक्षणाच्या शासकीय प्रशासनातील येणाऱ्या समस्यांचा अभ्यास.

5) प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांवर उपाय सुचविणे.

हा सर्व अभ्यास सद्यःस्थिती निर्देशक असल्याने प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केलेला आहे. सर्वेक्षण पध्दतीचे विषय, अभ्यासाची उद्दिष्टे, अभ्यासाचे क्षेत्रे, साधनतंत्रे, इत्यादी नुसार विविध प्रकार पडतात. संशोधनात कोणता अभ्यास अभिप्रेत आहे हे वर घेतलेल्या आढाव्यावरुन स्पष्ट होते.म्हणून

प्रस्तुत संशोधन हे "सर्वेक्षण" या प्रकारात मोडते.

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास असल्याने संशोधकाने प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक व शासकीय अधिकारी यांची निवड केली. त्यांच्यासाठी प्रश्नावली व मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार केली. या प्रश्नावलीच्या व मुलाखत प्रश्नसूचीच्या आधारे संशोधकाने संशोधनकार्य व प्रस्तुत अहवाल तयार केला. वरील प्रमाणे संशोधनपध्दती संशोधन अभ्यासासाठी स्पष्ट झाल्यावर संशोधनाची कार्यपध्दती संशोधकाने ठरविली.

4.04 **नमुना निवड** :-

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुन्याची निवड करताना उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांची निवड खालील प्रमाणे करण्यात आली.

1) उस्मानाबाद तालुक्यातील सर्वच्यासर्व अनुदान प्राप्त प्राथमिक शाळांची निवड केली.

2) उस्मानाबाद तालुक्यातील सर्व मराठी व उर्दु माध्यमांच्या प्राथमिक शाळांची निवड करण्यात आली.

3) उस्मानाबाद तालुक्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका व खाजगी संस्था यांनी चालवलेल्या सर्व शाळांची निवड करण्यात आली.

4) या सर्व प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची प्रतिसादकासाठी निवड केली.

5) गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांची प्रतिसादकासाठी शासकीय अधिकारी म्हणून निवड केली.

मुख्याध्यापकासमोर निर्माण होणाऱ्या प्रमुख समस्यांचा अभ्यास करावयाचा हेतू असल्याने मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. ती परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आली आहे.गटशिक्षणअधिकारी, शिक्षणविस्तारअधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली. गटशिक्षणाधिकार्यांची मुलाखत परिशिष्ट "ई" मध्ये देण्यात आली आहे. मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षणविस्तार अधिकारी यांची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

**कोष्टक क्रमांक - 4.01**

**नगुना निवड - प्रतिसादके**

| अनुक्रमांक | प्रतिसादक स्वरूप | प्रतिसादक संख्या |
|---|---|---|
| 01. | मुख्याध्यापक | 130 |
| 02. | केंद्रप्रमुख | 14 |
| 03. | शिक्षणविस्तार अधिकारी | 07 |
| 04. | गटशिक्षणाधिकारी | 01 |
| | एकूण | 152 |

4.05 **संशोधनाची साधने**

संशोधकाने संशोधनासाठी जो विषय निवडला आहे. त्यासंबंधात विविध प्रकारची माहिती गोळा करावी लागते ती माहिती जमा करण्याची ही विविध साधने आहेत. या अनेक साधनांमधून संशोधकाने योग्य त्या साधनांची निवड करणे आवश्यक असते. ही निवड योग्य होण्यास संशोधकाला त्या साधनांच्या गुणदोषांची व मर्यादांची जाणीव असणे आवश्यक आहे. या साधनापैकी एक अथवा अनेक साधनांचा वापर संशोधक करु शकतो. ही माहिती संख्यात्मक व गुणात्मक स्वरुपाची असू शकते.

संशोधन साधनामध्ये निरीक्षणे, मुलाखती, प्रश्नावली, प्रमाणित चाचण्या, पडताळासूची, गतावली, गटचर्चा अशी विवध साधने असतात. सदर संशोधन सर्वेक्षणावर आधारित असल्यामुळे प्रश्नावलीचा वापर करणे योग्य ठरते.

माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली शाळेच्या मुख्याध्यापकांकडे पाठवली. प्रश्नावलीत खालील मुद्दयांचा समावेश केला व त्या प्रत्येक मुद्दयांच्या बाबतीत प्रश्न निश्चित केले.

4.06 **मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली** :-

या प्रश्नावलीत मुख्याध्यापकांना कोणत्या उद्दिष्टानुसार प्रश्न विचारले ते स्पष्ट केले आहे. प्रश्नावलीतील विभाग, उद्दिष्टे

व प्रश्नप्रकार खालीलप्रमाणे आहेत.

| अनुक्रमांक | विभाग | उद्दिष्टे |
|---|---|---|
| 01 | मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती | मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती घेणे. |
| 02 | प्राथमिक शालेविषयी माहिती | प्राथमिक शालेविषयी सर्वसाधारण माहिती मिळविणे |
| 03 | कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर | प्राथमिक शालेच्या कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तरासंबंधी माहिती मिळविणे. |
| 04 | शिक्षकांविषयी माहिती | प्राथमिक शालेतील शिक्षकांच्या विद्यार्थ्यांविषयी माहिती मिळविणे. |
| 05 | विद्यार्थ्यांविषयी माहिती | विद्यार्थ्यांविषयी माहिती मिळविणे |
| 06 | भौतिक सुविधा व शालेय परिसर | प्राथमिक शालेतील भौतिक सुविधा व शालेय परिसर यांची माहिती घेणे व येणाऱ्या अडचणीची नोंद करणे |
| 07 | इतर | प्रश्नावलात इतर मुद्याखेरीज या संशोधनाच्या दृष्टीने माहिती मिळविणे. |

प्राथमिक शालेच्या प्रशासन संदर्भात माहिती हवी होती म्हणून मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. प्रश्नावलीत एकुण 6 विभाग होते. त्यात एकूण 65 प्रश्न विचारले. त्यातील 40 प्रश्न बध्द स्वरुपाचे आणि 15 प्रश्न मुक्त होते. बध्द प्रश्नातुन प्रशासनाची माहिती मिळविली. परंतु प्रशासनासंबंधी समस्यांची माहिती मिळण्यासाठी मुक्त प्रश्नांचा उपयोग केला.

प्रत्येक विभागात विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे आहेत.

विभाग 1 – मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती–

यात चार प्रश्न विचारले चारही प्रश्न बध्द स्वरुपाचे होते.

विभाग 2 – शाळेविषयी माहिती

यात आठ प्रश्न विचारले. सर्व प्रश्न बध्द स्वरुपांचे होते.

विभाग 3 – कार्यलयीन कामकाज व शालेय दप्तर

यात पंधरा प्रश्न विचारले. सर्व प्रश्न बध्द स्वरुपांचे होते.

विभाग 4 – शिक्षकविषयी

यात सोळा प्रश्न विचारले त्यातील नऊ प्रश्न बध्द स्वरुपाचे होते व सात मुक्त होते.

विभाग 5 – विद्यार्थ्याविषयी

यात बारा प्रश्न विचारले त्यातील चार बध्द स्वरुपाचे होते व आठ प्रश्न मुक्त स्वरुपाचे होते.

विभाग 6 – भौतिक सुविधा व शालेय परिसर

यात नऊ प्रश्न विचारले. त्यातील सर्व बध्द स्वरुपाचे होते.

विभाग 7 – इतर माहिती

यात एक प्रश्न विचारला होता व तो मुक्त स्वरुपाचा होता.

अशाप्रकारे 7 विभागामध्ये एकुण प्रश्न संख्या 65 (पासष्ठ) होती त्यापैकी 40 ( चाळीस) प्रश्न बध्द स्वरुपाचे आणि 15 (पंधरा) प्रश्न मुक्त स्वरुपाचे होते.

4.07 **केंद्रप्रमुख यांच्या मुसाखतीसाठी प्रश्नसूची** :–

प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनासंदर्भात, समूहशाळांसाठी नेमलेल्या केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली. या प्रश्नसूची मध्ये प्राथमिक शाळांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाविषयी 14 प्रश्न विचारण्यात आले.

केंद्रप्रमुखाची वैयक्तिक माहिती घेण्यात आली. त्यात त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, केंद्रप्रमुख पदाचा अनुभव या विषयासंबंधी माहिती घेण्यात आली.

शाळेतील पटनोंदणी वाढीसाठी केले जाणारे प्रयत्न, गळती रोखण्यासाठी प्रयत्न, समाजाचा प्राथमिक शिक्षणात सहभाग,

शिक्षकांचे पाठटाचण, शाळा तपासणी व ग्रामशिक्षण समिती कामकाज याबाबत प्रश्नसूची तयार करण्यात आली. केंद्रप्रमुखांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या.

4.08 **शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांसाठी प्रश्नसूची** :-

प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार करण्यात आली. या प्रश्नसूचीमध्ये प्राथमिक शाळांचे प्रशासनासंदर्भात शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांना 19 प्रश्न विचारण्यात आले. शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांची वैयक्तिक माहिती घेण्यात आली. त्यात त्यांची शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, प्रशासकीय अनुभव यासंबंधी माहिती घेण्यात आली.

शासकीय कामांची पूर्तता, शिक्षकांची पदोन्नती, वेतनवाढ, शाळादुरुस्ती, शाळांची तपासणी, प्राथमिक शिक्षणविषयक शासनाच्या विविध योजना व त्यांची अंमलबजावणी, गोपनीय अहवाल वेगवेगळे प्रशासकीय कामे, शाळा अभिलेख तपासणी या संदर्भात प्रश्नसूची तयार करण्यात आली. शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या.

4.09 **गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची** :-

उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसुची तयार करण्यात आली. या प्रश्नसूचीमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनासंबंधित दहा प्रश्न विचारण्यात आले. गटशिक्षणाधिकाऱ्यांचे नांव, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, प्रशासन अनुभव ही वैयक्तिक माहिती घेण्यात आली.

4.10 **प्राथमिक शाळांना भेटी व निरीक्षणे** :-

उस्मानाबाद तालुक्यातील 10 प्राथमिक शाळांना संशोधकाने भेटी दिल्या. या भेटीतून प्राथमिक शाळेच्या प्रशासनासंदर्भात माहिती मिळविली. संशोधकाने प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकांच्या भेटी घेतल्या. व त्यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या भेटीतून संशोधनासाठी अत्यंत उपयुक्त माहिती मिळाली.

निरीक्षण हे संशोधनाचे नैसर्गिक साधन आहे. निरीक्षण हे ज्ञान मिळविण्याचे प्रमुख व महत्वाचे साधन आहे. प्रत्यक्ष निरीक्षण केल्याने मिळालेल्या माहितीची पडताळणी करता येते. हे संशोधन सर्वेक्षण पध्दतीचे असल्याने. महत्वाची माहिती गोळा

करण्यासाठी निरीक्षण फारच उपयुक्त ठरते. संशोधकाला प्रत्यक्ष निरीक्षणातून निश्चित माहिती मिळविता आली. संशोधकाने उस्मानाबाद तालुक्यातील दहा शाळांना भेटी देऊन निरीक्षण केले. प्राथमिक शाळांमधील भौतिक सुविधांची पाहणी केली. या पाहणीमध्ये वर्गखोल्या, फर्निचर, कार्यालय, शैक्षणिक साधने, ग्रंथालय सुविधा, क्रिडांगण, प्रयोगशाळा सुविधा याबाबत निरीक्षण करुन माहिती मिळविली.

उस्मानाबाद तालुक्यातील दहा प्राथमिक शाळांना संशोधकांने भेटी दिल्या असता असे दिसून येते की, 8 शाळांच्या इमारती ह्या निकृष्ट दर्जाच्या होत्या. वर्गखोल्या लहान असून, वर्गात भरपूर सुर्यप्रकाश येत नाही. विद्यार्थ्यांसाठी पुरेशा फर्निचरची सोय नाही. शिक्षकांसाठी स्टाफरुम नाही. मुख्याध्यापकांना व कार्यालयास खोली नाही. शैक्षणिक साधनांचा उपयोग फक्त 40 % शाळा करतात 8 शाळांना क्रिडांगण नाही. असे भेटीअंती आढळून आले.

4.11 **संशोधनाची कार्यपध्दती** :-

संशोधनाच्या अभ्यासाठी संशोधकाने खालीलप्रमाणे कार्य केले आहे.

1) प्रथम संशोधक प्राथमिक शाळांशी संबंधित संदर्भ साहित्य व शासकीय परिपत्रकांचा अभ्यास केला.

2) संदर्भ साहित्याचा अभ्यास केल्यानंतर प्रस्तुत संशोधनाचा आराखडा तयार केला.

3) प्राथमिक शाळेचे प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी नूतन प्राथमिक विद्यामंदीर , उस्मानाबाद येथील मुख्याध्यापकांकडून माहिती मिळविली.

4) उस्मानाबाद तालुक्यातील अनुदानित प्राथमिक शाळांची संशोधन अभ्यासासाठी निवड करण्यात आली.

5) प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. केंद्रप्रमुख, शिक्षणविस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसूची तयार आली.

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर तर्फे आयोजित केलेल्या " संशोधनांची चर्चा " सेमीनारमध्ये तयार केलेल्या प्रश्नावली व प्रश्नसूचीसंबंधी चर्चा केली. ती प्रश्नावली मार्गदर्शकांकडून तपासून घेतली. तसेच प्रश्नावली व प्रश्नसूची शिक्षण शास्त्र महाविद्यालय उस्मानाबाद, येथील प्राध्यापकाकडून तपासून घेउन त्यात सुधारणा केल्या

6) संशोधनाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य होतील या दृष्टीने संपूर्ण माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारचे प्रश्न प्रश्नावलीत व प्रश्नसूचीत समाविष्ट करण्यात आले.

7) नूतन प्राथमिक विद्यामंदीर, उस्मानाबाद या शाळेच्या मुख्याध्यापकांकडुन प्रश्नावली भरुन घेतली. प्राथमिक शाळांशी संबंधित अहवाल व परिपत्रके या माहितीच्या आधारे मुख्याध्यापकांशी प्रत्यक्ष चर्चा करुन प्रश्नावली भरुन घेण्यात आली.

प्राथमिक शिक्षणाशी संबंधित केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीसाठी प्रश्नसुची तयार करण्यात आली . वरील सर्व शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती पूर्वी त्यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखतीसाठी वेळ मागून घेण्यात आला.

8) मुख्याध्यापकांना प्रश्नावली पाठविणे व त्यांच्याकडून भरून झालेली प्रश्नावली परत मिळविणे या सर्व गोष्टी पोस्टामार्फत केल्या या संदर्भात नियाजनबद्धकार्यवाहीची अंमलबजावणी केली.त्याच बरोबर कांही प्रश्नावल्या मित्रांच्या मदतीने व स्वतः जाऊन भरून घेण्यात आल्या.

9) संशोधकाने संशोधन कार्य सुरु असताना दहा प्राथमिक शाळांना भेटी दिल्या . प्राथमिक शाळांतील भौतिक घटकांचे निरीक्षण केले. माहितीची नोंद केली.

10) प्रश्नावलीद्वारे मिळालेली माहिती एकत्रित करण्यात आली. प्रत्येक विभागातील प्रत्येक प्रश्नाविषयी मुख्याध्यापक, शिक्षणविस्तार अधिकारी केंद्रप्रमुख व गटशिक्षणाधिकारी यांच्या प्रतिसादांचे संकलन करण्यात आले. माहितीच्या विश्लेषणासाठी व स्पष्टीकरणासाठी संख्याशास्त्रीय " शतमान " या पध्दतीचा अवलंब केला.

11) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील 1995–96 या शैक्षणिक वर्षातील आकडेवारीचे व माहितीचे संकलन केले.

12) मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षणविस्तार व गटशिक्षणाधिकारी यांच्या प्रश्नसूचीचे प्रतिसादाची संख्या व शेकडा प्रमाण काढले. सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करण्यात आले. माहिती कोष्टकांच्या रुपात संकलित करण्यात आली.

4.12 **समारोप**

मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीतून मिळालेली माहिती, केंद्रप्रमुख, शिक्षणविस्तार अधिकारी यांच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती, प्राथमिक शाळंना दिलेल्या भेटी, प्राथमिक शाळांचे केलेले निरीक्षण या सर्वातून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण विश्लेषण व विशदीकरण पुढील प्रकरणात करण्यात आले आहे.